प्रतिनियुक्तीने पद भरण्यासाठी मागणीपत्र

**क्रमांक : आस्थाप-२०२२/प्र.क्र.०७/जल-०२**
**मृद व जलसंधारण विभाग,**
**मादाम कामा रोड, हुतात्मा राजगूरू चौक**
**मंत्रालय,मुंबई-४०००३२**
**दिनांक : १५/०३/२०२२**
**दूरध्वनी - (०२२) २२०२३५२४/२५२६**

**प्रतिनियुक्तीने भरावयाच्या पदांचे मागणीपत्र**

मृद व जलसंधारण विभागाच्या अधिपत्याखालील आयुक्त, मृद व जलसंधारण(म.रा.), वाल्मी परिसर, कांचनवाडी, औरंगाबाद ४३१ ००२ येथील आयुक्तालयात खाली नमूद केलेली पदे त्यापुढे नमूद केलेल्या संवर्गातील नमूद केलेली शैक्षणिक व इतर अर्हता तसेच अनुभव धारण करणाऱ्या शासकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांमधून प्रतिनियुक्तीने अर्ज मागविण्यात येत आहेत. अशा संवर्गात इच्छूक किंवा पात्र उमेदवार मिळून न आल्यास निम्न संवर्गात व श्रेणीमध्ये समकक्ष पदावरील पदोन्नतीसाठी विहित केलेली अर्हता व अनुभव पूर्ण करणाऱ्या शासकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांचाही या पदावर प्रतिनियुक्तीसाठी विचार केला जाईल.

| पदाचे नाव | पदस्थापनेचे ठिकाण व पदांची संख्या | वेतनश्रेणी | पात्रता | ज्या संवर्गामधून भरावयाचे आहे त्या संवर्गाची नावे |
|---|---|---|---|---|
| अपर आयुक्त (प्रशासन) | औरंगाबाद-१ | एस -२९ : १३११००-२१६६०० | मूळ संवर्गामध्ये समकक्ष वेतनश्रेणीमध्ये वेतन आहरित करीत असलेल्या राज्य शासनाच्या सेवेतील कोणत्याही अधिकाऱ्यामधून. | अपर आयुक्त (प्रशासन) गट-अ या पदाच्या समकक्ष पद व वेतनश्रेणी धारण करित असलेल्या व्यक्तींच्या प्रतिनियुक्तीने |
| उप आयुक्त (प्रशासन) | औरंगाबाद-१ | एस - २३ : ६७७००-२०८७०० | मूळ संवर्गामध्ये समकक्ष वेतनश्रेणीमध्ये वेतन आहरित करीत असलेल्या राज्य शासनाच्या सेवेतील कोणत्याही अधिकाऱ्यामधून. | उप आयुक्त (प्रशासन) गट-अ या पदाच्या समकक्ष पद व वेतनश्रेणी धारण करित असलेल्या व्यक्तींच्या प्रतिनियुक्तीने |
| प्रशासकीय अधिकारी (गट-ब), | औरंगाबाद-१ | एस-१५ : ४१८००-१३२३०० | मूळ संवर्गामध्ये समकक्ष वेतनश्रेणीमध्ये वेतन आहरित करीत असलेल्या राज्य | प्रशासकीय अधिकारी (गट-ब), या पदाच्या समकक्ष पद व वेतनश्रेणी धारण |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | शासनाच्या सेवेतील कोणत्याही अधिकाऱ्यामधून. | करित असलेल्या व्यक्तींच्या प्रतिनियुक्तीने |

२. प्रतिनियुक्तीचे धोरणासंदर्भातील सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दि.१७/१२/२०१६ व शासन निर्णय दि.१६/०२/२०१८ मध्ये नमूद सर्व अटी व शर्ती तसेच तद्नंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी केलेल्या सुधारणांसह लागू राहतील.

३. प्रतिनियुक्तीने नियुक्ती प्रथमत: १ वर्षाच्या कालावधीसाठी राहील. तदनंतर आवश्यकता विचारात घेवून संबंधित अधिकाऱ्याची इच्छूकता व प्रतिनियुक्तीने सेवा देणाऱ्या संवर्ग नियंत्रण प्राधिकाऱ्याच्या संमतीने हा कालावधी जास्तीत जास्त ५ वर्षापर्यंत वाढविता येईल.

४. सर्व प्रशासकीय विभागांना विनंती करण्यात येते कि, सदर परिपत्रक त्यांच्या अधिपत्याखाली कार्यरत असलेल्या वर नमूद केलेल्या संवर्गातील सर्व अधिकाऱ्यांच्या निर्दशनास आणण्यात यावे.

५. सदर पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्तीसाठी इच्छुक व पात्र अधिकारी/कर्मचाऱ्यांनी त्यांचे अर्ज सोबत जोडलेल्या विहित नमुन्यात (परिशिष्ट-ड) भरून असे परिपूर्ण भरलेले अर्ज त्यांच्या प्रशासकीय विभागामार्फत निम्न स्वाक्षरिताकडे दिनांक......... पर्यंत पोहचतील अशा बेताने पाठवावेत.

६. प्रशासकीय विभागांनी/संवर्ग नियंत्रक विभागांनी परिपूर्ण स्वरूपातील अर्ज त्यांच्या आवश्यक प्रमाणपत्रासह व संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्याच्या मागील ५ वर्षाच्या गोपनीय अहवालाच्या सत्यप्रतीसह या विभागाकडे कोणत्याही परिस्थितीत दिनांक ०५.०४.२०२२ पर्यंत पाठवावेत. विहित मुदतीत अर्ज प्राप्त न झाल्यास अशा अधिकारी/कर्मचाऱ्यांचा विचार करण्यात येणार नाही.

(नाव) : अ.सा.चंदनशिवे
पदनाम: अवर सचिव, महाराष्ट्र शासन
दूरध्वनी क्रमांक **दूरध्वनी - (०२२) २२०२२५२६**

प्रति,

१. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग
त्यांना विनंती करण्यात येते की सदर जाहिरात आपल्या विभागाच्या संकेतस्थळावर व मंत्रालयीन इंट्रानेटवर प्रसिध्द करण्याची कार्यवाही करावी.
२. सामान्य प्रशासन विभाग (कार्यासन-१२)

## अटी व शर्ती

(१) प्रतिनियुक्तीचे धोरणासंदर्भातील सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दि.१७/१२/२०१६ व शासन निर्णय दि.१६/०२/२०१८ मध्ये नमूद सर्व अटी व शर्ती तसेच तद्नंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी केलेल्या सुधारणांसह लागू राहतील.

(२) प्रतिनियुक्तीवर पदस्थापनेसाठी पदग्रहण अवधी वित्त विभागाने यासंदर्भात वेळोवेळी केलेल्या नियमानुसार अनुज्ञेय राहील. संबंधित अधिकारी / कर्मचारी यांच्या प्रतिनियुक्तीच्या आदेशात, प्रतिनियुक्तीचा कालावधी सुरु होण्याचा व संपुष्टात येण्याचा दिनांक स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक राहील.

(३) प्रतिनियुक्तीने नियुक्तीचा विहित कालावधी पूर्ण झाल्यावर अधिकारी / कर्मचाऱ्यास मूळ प्रशासकीय विभागात प्रत्यावर्तित करणे आवश्यक राहील. ही कार्यवाही करण्याची जबाबदारी यथास्थिती संबंधित अधिकारी/कर्मचारी व प्रशासकीय विभाग / विभागप्रमुख व प्रतिनियुक्तीने सेवा घेणाऱ्या प्रशासकीय विभाग / विभागप्रमुख यांची राहील.

(४) प्रतिनियुक्तीचा कालावधी संपुष्टात आल्यावर प्रत्यावर्तित झालेल्या अधिकारी / कर्मचाऱ्याने, मूळ प्रशासकीय विभागात / कार्यालयात पदग्रहण अवधी उपभोगून अविलंब रुजू होणे आवश्यक राहील. तसेच प्रतिनियुक्तीचा कालावधी संपुष्टात आल्यावर त्यास जोडून कोणत्याही प्रकारची रजा अनुज्ञेय असणार नाही.

(५) प्रतिनियुक्तीने कार्यरत अधिकारी / कर्मचाऱ्याची सेवा लोकहिताच्या दृष्टीने मूळ प्रशासकीय विभाग / कार्यालयास आवश्यक असल्यास, विहित कालावधी संपण्यापूर्वी परंतु किमान एक वर्षाचा कालावधी पूर्ण झाल्यावरच त्यांच्या / तिच्या सेवा परत घेण्याचा अधिकार नियुक्ती प्राधिकाऱ्यास (प्रशासकीय विभाग / कार्यालयास) राहील.

(६) प्रतिनियुक्तीवर सेवा घेणाऱ्या कार्यालयास काही विशिष्ट कारणास्तव विहित कालावधी संपण्यापूर्वी प्रतिनियुक्तीवर आलेल्या अधिकाऱ्यास त्याच्या मूळ प्रशासकीय विभागास / कार्यालयाकडे परत पाठवणे आवश्यक असल्यास, त्या आस्थापनेवरील सक्षम प्राधिकाऱ्याने तसे समर्थनीय कारण स्पष्ट करुन त्याला / तिला परत पाठवण्यासाठी यथास्थिती संबंधित प्रशासकीय विभागास / कार्यालयास तीन महिन्याची पूर्वसूचना (नोटीस) देणे आवश्यक राहील. तथापि, या संदर्भात विशिष्ट कारणे नमूद करून उदा. अनियमितता, अफरातफर, कर्तव्यच्युती, इत्यादी कारणे नमूद करुन प्रतिनियुक्तीचा कालावधी तात्काळ संपुष्टात आणता येईल.

(७) आदेशात विहीत केलेला प्रतिनियुक्तीचा कालावधी पूर्ण होण्यापूर्वीच अधिकारी/कर्मचारी स्वतःहून मूळ प्रशासकीय विभागात / कार्यालयात परत जाण्यास इच्छूक असल्यास त्याने समर्थनीय कारण स्पष्ट करुन त्यासाठी किमान तीन महिन्यांची पूर्वसूचना (नोटीस) यथास्थिती दोन्ही प्रशासकीय विभागास/ कार्यालयास देणे आवश्यक राहील. अशा परिस्थितीत त्याच्या विनंतीवरुन प्रतिनियुक्ती संपुष्टात आणण्याचा निर्णय प्रतिनियुक्तीच्या आस्थापनेवरील कार्यालयातील सक्षम प्राधिकाऱ्याने घेतल्यास सदर कर्मचाऱ्याच्या पूर्ण सेवाकाळात अनुज्ञेय एकूण १० वर्षांच्या प्रतिनियुक्ती कालावधीतून आदेशात विहीत केलेला प्रतिनियुक्तीचा कालावधी त्याने उपभोगल्याचे समजण्यात येईल.

(८) सध्या प्रतिनियुक्तीने कार्यरत असलेल्या ज्या अधिकारी/कर्मचाऱ्यांचा विहित कालावधी पूर्ण झालेला नाही त्यांच्याबाबतीत कालावधी नमूद करुन प्रतिनियुक्तीचे सुधारित आदेश प्रतिनियुक्ती संदर्भातील प्रस्तुत धोरणाच्या अनुषंगाने संबंधीत अधिकारी/कर्मचाऱ्यास प्रतिनियुक्तीवर पाठविणाऱ्या मूळ प्रशासकीय विभागाने हे धोरण लागू झाल्यापासून ३ महिन्यात निर्गमित करणे आवश्यक राहील. अन्यथा त्यांची बदलीने प्रतिनियुक्ती आपोआप संपुष्टात येईल.

**********

प्रपत्र-अ

## मृद व जलसंधारण विभागांतर्गत भरावयाच्या पदांच्या विचारार्थ पाठवायच्या तपशीलाचे प्रपत्र

१. नाव (संपुर्ण नाव) :

२. ज्या पदासाठी अर्ज केला आहे ते पद व कार्यालयाचे नाव :

३. अ) सध्या धारण केलेले पद व पदस्थापनेचे ठिकाण :
ब) वेतनश्रेणी :

४. सध्या कार्यरत असलेल्या पदाचा संवर्ग नियंत्रक विभाग :

५. जन्मदिनांक :

६. अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास असलेले वय :
(वर्षे महिने)

७. शैक्षणिक अर्हता :

८. मागासवर्गीय प्रवर्गात येत असल्यास प्रवर्ग :

९. सध्या धारण केलेले पद नियमित आहे किंवा तात्पुरते :
आहे, नियमित असल्यास नियमित दिनांक

१०.अधिकारी यांनी घोषित केलेला स्वग्राम तालुका व जिल्हा:

११. शैक्षणिक अर्हता व अनुभव :-

| | |
|---|---|
| शैक्षणिक अर्हता | १.<br>२.<br>३. |
| अनुभव | १.<br>२.<br>३. |

आतापर्यंत केलेल्या सेवेचा तपशील :-

| कार्यालय/विभाग | पद (संवर्ग अथवा प्रतिनियुक्तीवर) | कालावधी | वेतनश्रेणी | कामाचे स्वरुप |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |

संपर्क तपशील

अ) पत्ता : ----------------------------------------------
----------------------------------------------

दुरध्वनी क्रमांक-----------------------------

मेल-----------------------------------------

ब) कार्यालयीन पता : --------------------------------------------

--------------------------------------------

दुरध्वनी क्रमांक----------------------------

मेल-----------------------------------------

मी श्री./श्रीमती-----------------------------------------------असे प्रमाणित करतो/करते की, मी प्रतिनियुक्तीने भरावयाच्या पदाच्या मागणीपत्रातील तपशील वाचले असून सदर पदासाठी विहीत केलेल्या अर्हता मी धारण करीत असल्याने सदर पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्तीसाठी अर्ज सादर करीत आहे. अर्जात नमुद केलेली माहिती खोटी आढळून आल्यास माझा अर्ज नाकारला जावू शकतो याची मला जाणीव आहे.

सही/---------------------------

(नाव)--------------------------

पदनाम-------------------------